# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-मनप-२००७/प्र.क्र.१८/का-५
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ७ एप्रिल, २००७.

## आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर निवडणूक कार्यक्रमाच्या कालावधीत विविध राजकीय पक्ष, आघाडया व निवडणूक लढविणारे उमेदवार यांच्याकडून आचारसंहितेची अंमलबजावणी योग्य रितीने करण्यात येते की नाही यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित क्षेत्रामध्ये निवडणूकविषयक कार्यवाहीचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यास राज्य निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे. अशा व्हिडिओ चित्रीकरणाच्या चित्रफितीची तपासणी किंवा चित्रफितीच्या प्रमाणित प्रतीची मागणी संबंधित उमेदवारांकडून अनेकदा होत असते. अशा मागणीसंदर्भात व्हिडिओ चित्रफितीची (सीडी) तपासणी करणे अर्जदारांना उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे ठरविली आहेत :-

(१) संबंधित व्हिडिओ चित्रफितीच्या तपासणीसाठी लेखी अर्ज करण्यात यावा. अर्जामध्ये, ज्या निवडणुकीसंबंधी सीडी पहावयाची असेल त्या निवडणुकीच्या दिनांकासहित संपूर्ण माहिती देण्यात यावी. पडताळणीसाठी दर तासाला रुपये २५/- याप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. अर्ज केल्याच्या तारखेच्या लगतच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतर पडताळणी करता येईल. संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात / संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयात चित्रफित तपासणीसाठी उपलब्ध असेल. जर चित्रफितीची तपासणी तात्काळ करावयाची असेल तर पडताळणी शुल्क दर तासाला रुपये ५०/- याप्रमाणे अदा करावे लागेल.

(२) व्हिडिओ चित्रीकरणाची प्रमाणित सीडी हवी असल्यास वरील १ येथे नमूद केल्याप्रमाणे अर्जात संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे व त्याकरिता अर्जाचे शुल्क रुपये २५०/- (एका चित्रफितीसाठी) एवढे असेल.

(३) अर्जदारास व्हिडिओ चित्रीकरणाच्या तपासणीसाठी/ चित्रीकरणाची चित्रफित मागण्यासाठी स्पष्ट व निश्चित कारण देणे आवश्यक असेल व अर्जदाराचा त्या व्हिडिओ चित्रीकरणाशी व्यक्तिशः संबंध कसा आहे, हे दाखविणे आवश्यक असेल.

थट्टाच आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व अनुच्छेद २४३ झेडए खाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. भारतीय संविधानाच्या या अनुच्छेदांखाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्र, निष्पक्ष वातावरणात व पारदर्शीपणे पार पाडाव्यात यासाठी राज्य निवडणूक आयुक्त या नात्याने असे आदेश देत आहे की, असा दावा किंवा गुन्हा मागे घेताना राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
१) अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) महासंचालक, पोलिस, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व महानगरपालिका आयुक्त
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व पोलिस आयुक्त
९) सर्व पोलिस अधिक्षक,
१०) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
११) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी